# ‘चित्शक्ती विलास’ यामधील उद्धरण

## बेन विल्यम्स् यांनी पठण केलेले

बाबा लिहितात :

मी एका महात्म्याच्या पुस्तकात एका ज्ञाननिष्ठ, ध्यानरत महापुरुषाच्या निर्वाणाच्या वेळी घडलेली एक गोष्ट वाचली होती. ती फारच चांगली, खरी, अनुभवयुक्त आहे. महात्माजींना कालज्ञानाद्वारे आपल्या अंतकाळाबद्दल समजले होते. प्रयाणकाळी ते सर्वांना भेटले आणि सर्वांकडे त्यांनी आशीर्वाद मागितला, सर्वांची क्षमा मागितली. सर्व उपस्थितांना धन्यवाद दिले. तदनंतर सर्व दिशांना, पंचमहाभूतांना आणि विद्यादाता गुरूंना नमस्कार करून, ज्या शरीरात त्यांनी परमार्थयात्रा पूर्ण केली, ज्या शरीरात परमात्म्याला पाहिले, जे शरीर परमात्म्याचे चालते-फिरते-बोलते मंदिर आहे, जे शरीर परमात्म्याकडून प्राप्त झालेले आहे, त्या आपल्या शरीराला धन्यवाद दिले, त्याचा सन्मान केला.

ते संत महामुनी हात जोडून आपल्या प्रिय शरीराला म्हणू लागले, “हे माझ्या प्रिय शरीरा! तुझ्याच पूर्ण अनुग्रहाने, तुझ्या मदतीने मी परमात्म्यापर्यंत पोहोचू शकलो. तुला मी धन्यवाद देतो. न जाणे मी तुला किती पीडित केले असेल. किती त्रास दिला असेल. मी तुला खूप यातना, पीडा दिली आहे. परंतु तू प्रत्येक वेळी मला मदत केलीस. मी तुझा खरोखरच ऋणी आहे. तुझ्यामुळे मला ध्यानाची उत्तम गती मिळाली आहे. हे माझ्या प्रिय शरीरा! तुझ्यामुळेच मला उत्तम कुशलतापूर्ण मती मिळाली आहे. तुझ्यामुळेच मला ध्यानाद्वारे निर्विकल्प स्थिती प्राप्त झाली आहे आणि परमोत्कृष्ट पद मिळाले आहे. म्हणून प्रिय मित्रा! मी तुझा सदैव ऋणी आहे. कळतनकळत मी तुझे किती अपराध केले असतील; परंतु तू मात्र नेहमी उपकारच केलेस, साहाय्यच केलेस. अपकाराच्या बदल्यात सहायक बनून तू माझा सांगाती-साथी बनलास. तुझ्यावाचून मी ना परमात्म्यापर्यंत पोहोचलो असतो, ना उत्तम साधना करू शकलो असतो.” अशा प्रकारे शरीराला संबोधित करून ते महात्मा ब्रह्मलीन झाले.

आणि मग बाबा पुढे लिहितात :

> ज्याला शरीराचा बोध झाला आहे, तो त्याला योगपूर्ण, प्रेमपूर्ण आणि ध्यानपूर्ण बनवितो. [१]

© २०२६ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

[१] स्वामी मुक्तानंद, *चित्शक्ती विलास : एक आध्यात्मिक आत्मकथा,* [चित्शक्ती पब्लिकेशन्स, २०२२], पृ. २६२.